# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१५४ दिनांक - २३/०४/२०२४

## ३४ वर्षापासुन खुनाच्या गुन्हयांत फरारी असलेल्या आरोपीतास अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश

फिर्यादी नामे श्री रॉयल ऊर्फ रेनॉल्ड क्रिस्टन अमन्ना, रा. २/४ ब्लॉसम सोसायटी, मरोळ, मिल्ट्री रोड, अंधेरी पुर्व मुंबई यांनी फिर्याद दिली कि, दिनांक ०२/१२/१९९० रोजी २२.०० वाजता. मौजे मिरा येथील मिरा अपार्टमेंट, येथे पार्टी चालु असतांना यांतील आरोपीत नामे स्टिव्ह मारवीन नाझरेस डेव्हिड यांने मागील भांडणाचा राग मनात धरुन, गैर कायदयाची मंडळी जमवुन, गर्दी करुन यातील मयत ग्रॅब्रीयल ऊर्फ सुधाकर क्रिस्टल अमन्ना वय-२२ वर्षे, रा. २/४, ब्लॉसम सोसायटी, मरोळ, मिल्ट्री रोड, अंधेरी पुर्व मुंबई यास यातील आरोपीत यांनी त्याचेवर चाकुने वार करुन त्यास जिवे ठार मारुन खुन केला म्हणुन दिले फिर्यादी वरुन **काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १०३/१९९० भा.दं.वि.सं.कलम ३०२,१४७,१४८,१४९,१२०-ब प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयांमध्ये आरोपीत नामे १)संजय पुर्ण नांव माहीत नाही रा. भांडुप २)जहांगीर दिनमोहमद शेख रा. चिमटपाडा मरोळ मुंबई, ३)संतोष, ४) पास्क्ोल ५)किशोर हे गुन्हयांतील पाहीजे आरोपीत आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयातील गंभीर व क्लिष्ट स्वरुपांचे खुनाच्या गुन्हयांतील पाहीजे व फरारी आरोपीतांचा शोध घेणे बाबत मा. पोलीस आयुक्त सो यांनी आदेशीत केले होते. गुन्हे शाखा कक्ष -१, काशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांचे तपास पथक सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीत यांचा शोध घेत होते. पो.हवा. पुष्पेंद्र थापा यांचे बातमीदारामार्फत आरोपीत नामे जहांगीर दिनमोहमद शेख यांची माहीती मिळाली होती. त्या अनुशंगाने आरोपीत नामे जहांगीर दिनमोहमद शेख वय-६१ वर्षे, व्यवसाय-बेकार, रा. रुम नं. ०८, देवकी नंदन चाळ, चिमटपाडा, अर्धेरी कुर्लारोड, अंधेरी पुर्व, मुंबई-५९ दिनांक २२/०४/२०२४ रोजी १७.०० वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीतांकडे केलेल्या चौकशीमध्ये आरोपीताचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झालेला आहे. आरोपीतास पुढील कारवाई कामी काशिमीरा पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि.प्रशांत गांगुर्डे, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, सहाफौज संदीप शिंदे, पोहवा/पुष्पेंद्र थापा, पोहवा/संतोष लांडगे यांनी केली आहे.